आकाशवाणी पुणे
पुणे वृत्तांत
वेळ - संध्याकाळी ०६.०० वा.

दिनांक – २५/०३/२०२४ वार – सोमवार

पुण्यात सर्वत्र आज धूलिवंदनाचा उत्साह दिसून येत आहे. रंगांमध्ये रंगलेल्या तरुणाईचा जल्लोष विविध रस्त्यांवर सुरू आहे. भोई प्रतिष्ठानच्या वतीने दर वर्षी विशेष मुलांसाठी रंग बरसे हा महोत्सव आयोजित केला जातो. यंदाही सुमारे एक हजार १००० विशेष मुलांनी या महोत्सवाचा आनंद लुटला. अनाथ, एचआयव्हीग्रस्त, मतिमंद, आणि दिव्याग मुलं यात सहभागी झाली होती. पर्यावरण पूरक आणि नैसर्गिक रंगांचा वापर, युद्धात अपंगत्व आलेल्या सैनिकांचा आणि पोलीस, प्रशासनासह, विविध क्षेत्रातील मान्यवरांचा सहभाग हे या महोत्सवाचं वैशिष्ट्य ठरलं.

पिंपरी-चिंचवड पोलीस प्रशासनानं गुढीपाडवा आणि रमजानच्या पार्श्वभूमीवर सर्वधर्मीय चर्चासत्राचं आयोजन केलं होतं. सण उत्सवांच्या काळात कायदा सुव्यवस्था सुरळीत रहावी, कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी हे चर्चासत्र घेण्यात आलं. सणासुदीच्या दिवसात एकोपा जपत आनंदोत्सव साजरा करा; मात्र हे करत असताना समाजातील गरजू लोकांना सहकार्य करा, असं आवाहन चिंचवड पोलीस स्थानकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र कोळी यांनी यावेळी केलं.

सामाजिक समस्यांची जाण असलेल्या आणि त्या सोडवण्यासाठी झटणाऱ्या हातांना बळ देणं हे आपले कर्तव्य आहे, असं प्रतिपादन ज्येष्ठ लेखिका आणि अनुवादक वीणा गवाणकर यांनी नुकतंच पुण्यात केलं.
अहमदनगर इथल्या स्नेहालय संस्थेच्या स्नेहाधार पुणे परिवाराच्या पुरस्कार सोहळयात त्या बोलत होत्या. श्रीगोंदा इथल्या महामानव बाबा आमटे संस्थेच्या माध्यमातून फासेपारधी जमातीमधील मुलांच्या विकासासाठी कार्यरत असणाऱ्या शुभांगी झेंडे आणि ‘समाजबंध' या सामाजिक संस्थेच्या माध्यमातून ‘महिला आरोग्य आणि मासिक पाळी' या क्षेत्रात कार्यरत

असणाऱ्या शर्वरी सुरेखा अरुण यांचा यावेळी स्नेहाधार गौरव पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला.

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या कर संकलन आणि कर आकारणी विभागाने एक हजार कोटी रुपयांच्या कर संकलनाचं उद्दिष्ट ठेवलं आहे. कर संकलनाचा हा शेवटचा आठवडा असून सुटीच्या दिवशीही कर संकलन कार्यालय सुरू ठेवण्याचा निर्णय पालिका प्रशासनाने घेतला होता. आतापर्यंत 865 कोटी रुपयांचं कर संकलन झालं आहे.

आगामी लोकसभा निवडणुकीत पुण्यासह सातारा, सांगली, कोल्हापूर आणि सोलापूर जिल्ह्यांचा समावेश असलेल्या पश्चिम महाराष्ट्रात तुल्यबळ लढती पहायला मिळणार आहेत. संपूर्ण राज्याच्या राजकारणावर वर्चस्व गाजवणारा हा विभाग असून साखर आणि सहकार क्षेत्रात अग्रेसर मानला जातो. आजघडीला राज्यातील महायुती आणि महाआघाडीचे या विभागातील सर्व उमेदवार जाहीर झालेले नसले तरी जाहीर झालेले उमेदवार आणि संभाव्य नावे लक्षात घेता यावेळच्या लढती चांगल्या होतील अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

लोकसभा निवडणुकीचा बिगुल वाजल्यानंतर आता विविध पक्षांच्या जाहीर सभा आणि प्रचार मोहिमा सुरू होतील. यासाठी पिंपरी चिंचवड महापालिका प्रशासनाने शहरातील 66 ठिकाणं निर्धारित केली असून तिथेच प्रचार सभा घेण्याचं आवाहन केलं आहे.

सदाशिव पेठेतील टिळक स्मारक मंदिर ते पेरुगेट या रस्त्यावर ११ मार्च रोजी डांबरीकरण करून रस्ता करण्यात आला. त्यातील ९० मीटर रस्त्यावर १५ मार्चपासून महावितरण कंपनीला खोदाई करण्यासाठी परवानगी देण्यात आली असून महावितरणनं खोदकाम सुरू केलं आहे. याबाबत सजग नागरिक मंचाचे विवेक वेलणकर यांनी महापालिका आयुक्तांकडे तक्रार केली आहे.

समाजात अपस्मार शत्रक्रियेविषयी जागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने पुण्यात आज पर्पलथॉन या विशेष वॉकथॉनचं आयोजन करण्यात आलं होतं. यामध्ये ३५०हून अधिक लोकांनी सहभाग घेतला होता. रोटरी क्लब ऑफ पुणे बाणेर, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ

एज्युकेशन अँड बिझनेस मॅनेजमेंट, रोट्रॅक्ट क्लब आणि इंडस चॅम्प्स स्कूल यांनी बालेवाडीच्या शिवछत्रपती क्रीडा संकुलात हा उपक्रम घेतला. दीनानाथ मंगेशकर रुग्णालयातील अपस्मार विभागाचे प्रमुख अपस्मार शल्य विशारद डॉ. निलेश कुरवाळे यांनी यावेळी अपस्मार आजारावरील शस्त्रक्रिया या विषयावर मार्गदर्शन केलं.

परदेशातून पाठवलेल्या कुरिअरच्या पाकिटात अमली पदार्थ, परदेशी चलन सापडल्याचं सांगून नागरिकांकडून पैसे उकळण्याचा प्रकार पुण्यात समोर आला आहे. बाणेर भागातील एका डॉक्टरची सायबर चोरट्यांनी एक कोटी एक लाख ३० हजार रुपयांची फसवणूक केली आहे. या प्रकरणी सायबर चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

हवामान
पुण्यात आज कमाल तापमान ३८ अंश तर किमान तापमान १८ पूर्णांक ९ दशांश अंश नोंदवलं गेलं. उद्याही कमाल तापमान साधारण ३८ अंशांच्या आसपास राहाण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं वर्तवली आहे.

तर हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू संध्याकाळी ०६.०० वाजता, विविध भारती पुणे केंद्रावर, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये. नमस्कार.